# बस नाम काफी है...



शून्यातून विश्व निर्माण करणारा स्वतःच्या कर्तुत्वावर अस्तित्व निर्माण करणारा दिलदार व्यक्तिमत्व म्हणून ओळखला जाणारा सर्व मित्र परिवारांचा लाडका सर्वसामान्य च्या मदतीला धावणारा गोरगरिबाच्या अडीअडचणींच्या वेळी खंबीरपणे उभा राहणारा अनेकांचे रुग्णालय प्राण वाचवणारा गोरगरिबांच्या मुला मुलींच्या लग्नाला शिक्षणाला अडचणींच्या वेळी धावून जाणारा अठरापगड जातींच्या मुलांना सोबत चांगला विचार मांडणारा मित्र बंधू अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणारा बीड जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांना सर्व तरुण तडफदार तरुणांना सर्वसामान्य साठी सदैव कटिबद्ध असलेला ना जातींचा ना धर्मांचा एक हात मदतीचा हेच ब्रीदवाक्य घेऊन सीताई कंट्रक्शन च्या माध्यमातून बीड जिल्ह्याच्या विकासाला कलाटणी देणारा सुमारे ५०० हून जास्त परिवारांचा आधारस्तंभ सर्वांचा आवडता सर्वांना आपला वाटणारा मित्र बंधू रणजीत भैय्या क्षीरसागर या दिलदार व्यक्तिमत्वात उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा....

## दिलदार मित्र बंधू

# रणजीत भैय्या क्षीरसागर

यांना

आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा...!



शुभेच्छुक

**सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवार**

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २७२ ■ शुक्रवार दि.२० जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 272 ■ Friday Dt.20 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# चार चाकी कार घेण्यासाठी माहेर वरून दहा रुपये घेऊन ये म्हणत पोलिसानेच केला पत्नीचा छळ..!

## पोलिसानेच पत्नीचा छळ केल्याने एकच खळबळ; याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# एसपी साहेब, बीड जिल्ह्यात वैष्णवी हगवणे पुनरावृत्ती होऊ देऊ नका?

## रेणुका विनोदच्या त्रासांला कंटाळली टोकाचे पाऊल उचलण्याआधी पोलीस खात्याने ॲक्शन मोडवर यावं

## चार चाकी गाडीसाठी पतीकडून दररोज नित्यनेमाने मारहाण; माहेरातून दहा लाख रुपये घेऊन ये अशी मागणी?

## बीड जिल्हा वांटेड झोन पती-पत्नीत दहा लाखांसाठी वाद; जिल्ह्यात पैसा झाला मोठा माणूस झाला खोटा अशी स्थिती निर्माण?

बीड । प्रतिनिधी
पोलीस कर्मचाऱ्यानेच १० लाख रुपयांसाठी पत्नीचा छळ केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी चार जणांविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. २०२१ पासून रेणुका यांचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जात होता. चक्क पोलीस कर्मचाऱ्याकडूनच १० लाखांसाठी पत्नीचा छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात पिंपळनेर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेणुका विनोद कुटे यांनी याबाबत तक्रार दिली होती. त्यांचे पती विनोद कुटे बीड जिल्हा पोलीस दलात कार्यरत असून सध्या ते पोलीस मुख्यालयात पदस्थापनेवर आहेत. २०२१ पासून रेणुका यांचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जात असल्याची तक्रार देण्यात आली आहे.




### चारचाकी गाडी घेण्यासाठी माहेराहून १० लाख रुपये घेऊन ये

चारचाकी गाडी घेण्यासाठी माहेराहून १० लाख रुपये घेऊन ये असं म्हणत रेणुका यांचा छळ मागील काही वर्षांपासून केला जात आहे. शिवीगाळ करुन मारहाण केली त्याचबरोबर धमकी देखील दिल्याची माहिती त्यांनी दिली आहे. याप्रकरणी विनोद कुटे, सीता कुटे, रोहिणी गाडे आणि गोविंद गाडे या चार जणां विरोधात पिंपळनेर पोलीस ठाण्यात हा गुन्हा नोंदविण्यात आला. दरम्यान या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत असून पोलिसानेच पत्नीचा छळ केल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेणुका विनोद कुटे यांनी याबाबत तक्रार दिली होती.

### पैशासाठी छळ आणि मारहाण

काही दिवसांपूर्वीच पुण्यातील पिंपरी चिंचवड भागात २३ वर्षीय विवाहित वैष्णवी हगवणेनं गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली होती. वैष्णवी ही अजित पवार गटाचे तत्कालीन तालुकाध्यक्ष राजेंद्र हगवणेची सून होती. राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबाकडून हुंड्यासाठी वैष्णवीचा छळ केला जात होता. माहेरून पैसे आणण्यासाठी तिला मारहाण देखील केली जात होती. सासरच्या त्रासाला कंटाळून वैष्णवीनं आत्महत्या केली होती. वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरण ताजं असताना आता बीडमधून देखील अशीच एक घटना समोर आली आहे. पोलिसानेच पैशांसाठी पत्नीचा छळ केल्याची घटना समोर आली आहे.

# ब्रम्हगावचा ठाण्यावाघ सय्यद सद्दाम पटेल अखेर राष्ट्रवादीत दाखल..!

## माजी आ.अमरसिंह पंडितांनी मोहरा टिपला; गावाच्या विकास कामाला गती मिळणार





गेवराई । प्रतिनिधी
गेल्या अनेक वर्षापासून शिवसेनेचे माजी मंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करत असलेले, ब्रम्हगावचे खंदे समर्थक सय्यद सद्दाम पटेल यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला आहे. सय्यद सद्दाम पटेल हे ब्रम्हगाव- कुंबेजळगाव या ग्रुप ग्रामपंचायतचे उपसरपंच असून, त्यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून कृष्णाई येथे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत केले. सय्यद सद्दाम पटेल यांच्या प्रवेशाने गावाच्या विकासाला गती मिळणार आहे. गावाच्या विकासासाठी त्यांची मोठी तळमळ आहे. विकास कामात त्यांची मोठी भरारी असून, सर्वसामान्य तसेच गोरगरिबांना न्याय देण्यासाठी त्यांचे सतत प्रयत्न असतात. ब्रह्मगाव या ग्रामीण भागातून विकासाची गंगा वाहणार आहे कारण विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली गावाच्या विकासाचा पॅटर्न राबवण्याचे सुत्रे सय्यद सद्दाम पटेल यांच्या हाती आल्याने याचा फायदा गावातील विकास कामाला निश्चितपणाने होईल. गावाचा विकास हाच आपला विकास हे ध्येय मनात कायम ठेवत विकास कामाला प्राधान्य देऊन त्यांनी हा प्रवेश केला असल्याची माहिती दिली. ब्रह्म गावाच्या विकासाला चालना देण्यासाठी इथे अमरसिंह पंडित यांनी अखेर मोहरा टिपला अशी चर्चा आनंदमय गुलाल उधळून झाली. या

पान २ वर

### वर्दीतील देव माणूस हरपला जनसामान्य लोकांसह बीड जिल्हा पोलिस दलात हळहळ

## पो.हे.कॉ. समीर मुजावर यांचे हृदयविकाराच्या धक्याने निधन

बीड । प्रतिनिधी



अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पो.कॉ. समीर मुजावर यांचे आज सकाळी हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले. त्यांना आज सकाळच्या सुमारास अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि हृदयविकाराचा धक्का बसला.

त्यांना तात्काळ अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तिर्थ रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पो.कॉ. समीर मुजावर बीड जिल्हा पोलीस दलात कार्यरत होते. अंबाजोगाई पुर्वी त्यांनी बीड च्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यातही कर्तव्य बजावले होते. त्यांच्या निधनाची बातमी जिल्हा पोलीस दलातील अनेकांना चटका लावणारी ठरली. मजावर कुटूंबियांच्या दुःखात सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवार सहभागी आहे.

# जीर्ण झालेली विद्युत तार एक फूट अंतरावर पडली अंगणवाडीतील पाच बालके सुदैवाने बचावले

## प्रशासन व महावितरणच्या निष्काळजीपणामुळे पुरुषोत्तमपुरी येथील नागरिकांच्या जिवीतास धोका; वारंवार तक्रार करूनही याकडे दुर्लक्ष का?

माजलगाव । प्रतिनिधी
देशातील एकमेव देवस्थान असलेले श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी या ठिकाणी महावितरण व प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे नागरिकांच्या व भाविक भक्तांच्या जीवास धोका निर्माण झालेला आहे. या गावांमध्ये अनेक वर्षापासून पोलवर लटकलेल्या जुनाट व जीर्ण तारा आहेत या तारा तुटून पडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे यामुळे याची वारंवार तक्रार केलेली आहे परंतु महावितरण व प्रशासन यांच्याकडून टाळाटाळ होत असून काल दिनांक १९ जून रोजी सकाळी दहाच्या सुमारास पुरुषोत्तम पुरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असलेल्या अंगणवाडी जवळ जीर्ण झालेली विद्युत तार अंगणवाडीत जाणाऱ्या पाच बालकांच्या जवळ एक फूट अंतरावर तुटून पडली यात सुदैवाने त्या बालकांचा जीव वाचलेला आहे.

पोल वरील तारा ह्या अत्यंत जीर्ण झालेल्या असून वारंवार तुटून पडत आहेत यामुळे गावातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे. या बाबतीत वारंवार तक्रार करूनही महावितरण व प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. एखाद्या व्यक्तीचा जीव गेल्यानंतर प्रशासनाला जाग येणार आहे का असा सवाल या ठिकाणी नागरिकांनी उपस्थित केलेला आहे.



सकाळी लहान लहान बालके अंगणवाडीत, शाळेत जात असतात, गावामध्ये वर्दळ असते तसेच लोकांच्या घरावरून या तारा गेलेल्या आहेत या तारा अत्यंत जीर्ण झालेल्या असून तारा तुटण्याचं प्रमाण खूप वाढलेल आहे. पुरुषोत्तमपुरी येथे अनेक ठिकाणी जीर्ण झालेल्या तारा आहेत. यामुळे कधीही तुटून पडतात, या अगोदर पण या तारा तुटून पडलेल्या आहेत याची वारंवार महावितरण व

पान २ वर

# अखेर कामखेड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची नविन सुसज्ज ईमारत बांधकाम पुर्ण

## निजामकालीन मोडकळीस आलेल्या शाळेच्या भिंतीचा कोपरा ढासळुन विद्यार्थ्यांचा हात फ्रॅक्चर झाला होता

बीड । प्रतिनिधी
बीड तालुक्यातील कामखेड येथील निजामकालीन केंद्रीय प्राथमिक शाळा मोडकळीस आल्याने दि.१३ जुलै २०२२ रोजी इयत्ता ४ थी मधील कुंदन विजय ओव्हाळ या विद्यार्थ्यांच्या हातावर मोडकळीस आलेल्या शाळेच्या भिंतीचा कोपरा ढासळुन हात फ्रॅक्चर झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व सहकाऱ्यांनी शाळेला भेट देऊन ज्ञानमंदिरांना निधी देण्यात यावा यासाठी वारंवार आंदोलने केली होती.तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड शशिकांत कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद बीड सुरेश बाहेगव्हाणकर यांनी दखल घेत प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन नविन ४ खोल्यांच्या इमारतीसाठी ३६ लाख ८० हजार रूपयांचा निधी मंजूर केला होता. ३ वर्षांनंतर शाळा इमारतीचे काम पूर्ण झाले असुन आता यावर्षीपासून नविन ईमारतीत विद्यार्थी ज्ञानार्जन करत असुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते, प्रसारमाध्यमे, ग्रामस्थांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शिक्षण विभागाने निधी देऊन सोडवला असुन याबद्दल समाधान व्यक्त करत अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याचे डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असून यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत. जिल्ह्यातील ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ खोल्या धोकादायक असून पावसाळ्यात मोठा पाऊस अथवा वादळवारा आल्यास धोका निर्माण होऊ शकतो. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतीची दुरावस्था असून कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत, तर कुठे छत पडलेले तर कुठे दरवाजे खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून शाळावर्ग खोल्यांची दुरुस्ती



आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असल्याने तसेच वेळेवर उपलब्ध निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांचे अडचण होत असून दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्त करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

**विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनासाठी सुसज्ज शाळा सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थांच्या पाठपुराव्यामुळे शिक्षण विभागाने उपलब्ध करून दिली : चव्हाण एस.एम.**

जवळपास १०० पेक्षा जास्त विद्यार्थी पटसंख्या असलेली निजामकालीन शाळा मोडकळीस आली होती.२०२२ मध्ये शाळेच्या भिंतींचा कोपरा ढासळुन विद्यार्थी जखमी झाला होता.यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, सरपंच, ग्रामस्थांनी पाठपुरावा केल्यानंतर शाळेला निधी मिळाला आणि सुसज्ज अशी इमारत बांधण्यात आली असुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मिटला असल्याचे सहशिक्षिका चव्हाण एम.एस. यांनी सांगितले.

**जुनी शाळा अंगावर पडती का काय अशी भिती वाटायची : आरजु शेख (विद्यार्थीनी)**

सन २०२२ मध्ये कुंदन ओव्हाळ विद्यार्थ्यांच्या अंगावर भिंतींचा कोपरा कोसळुन जखमी झालेल्या विद्यार्थ्यांची आठवण सांगताना जुन्या शाळेत वर्गात बसायला भिती वाटायची शाळा अंगावर पडती की काय? आता शाळा नविन झाली त्यामुळे आम्हाला आनंद वाटतो अशी प्रतिक्रिया आरजु शेख विद्यार्थीनीने डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना दिली.

**मोडकळीस आलेल्या निजामकालीन ईमारतीच्या ठिकाणी नविन वर्गखोल्यांचे बांधकाम प्रगतीपथावर : सुरेश बाहेगव्हाणकर**

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यांच्या ठिकाणी नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करणे व इमारत विरहित शाळांना वर्गखोली उपलब्ध करून देणे.याबाबत प्रशासनाने शासन स्तरावरून पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून घेऊन बऱ्याच ठिकाणी वर्गखोल्यांची बांधकामे पुर्णत्वास आलेली आहेत. कामखेडा येथील निजामकालीन ईमारत पाडुन त्याठिकाणी राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान अंतर्गत नविन टुमदार ४ वर्गखोल्यांची रूपये ३६ लाख ८० हजार रूपयांच्या ईमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आलेले असुन विद्यार्थी आनंदाने भितीविरहीत शिक्षण घेत असल्याची प्रतिक्रिया कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद बीड सुरेश बाहेगव्हाणकर यांनी दिली.

# विठुराया, आम्ही निघालोय सायकलवर..!

गेवराई । प्रतिनिधी
पर्यावरण संवर्धन, झाडे लावा, झाडे जगवा, हा महत्त्वपूर्ण संदेश आणि मुखी विठ्ठल नामाचा गजर करीत निघालेली बुलढाण्याची सायकल वारी गुरुवार ता. १९ रोजी सकाळी नऊ वाजता गेवराई जि.बीड शहरात आली. शहरातील नागरिकांनी वारीचे स्वागत केले आहे. विठू तुझा लळा लागला. असा सूर सायकल वारीतून उमटला आहे. १८ जून रोजी महाराष्ट्रातील महत्त्वाच्या दिंड्या पंढरपुरच्या दिशेने पायी निघाल्या आहेत. मानाच्या दिंड्याने प्रस्थान करताच, वारकरी विठू नामाचा गजर करीत, चालू लागल्याचे भक्तीमय चित्र दिसून येत आहे.



सायकलवर प्रवास करून, निघालेली सायकल वारी पंढरपुरात पोहचणार आहे. गेवराई शहरात आलेल्या बुलढाण्याच्या सायकल वारीने लक्ष वेधून घेतले. विशेष म्हणजे, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सायकलवर आलेले वीस हजार वारकरी एकत्र दिसणार आहेत. हिरव्या रंगाचे टी–शर्ट, हेल्मेट घालून आलेल्या वारकऱ्यांनी लक्ष वेधून घेतले. दररोज तीस–पस्तीस किलोमीटर अंतर पार करून, चौथ्या दिवशी सदरील वारी विठ्ठलाच्या पंढरपुरात दाखल होणार आहे.

ठरलेल्या ठिकाणी सायकल वारीचा रिंगण सोहळा पार पडणार आहे. या संदर्भात, बुलढाण्यातून आलेले दिपक कॅवल, विष्णू गाडे यांनी सांगितले की, विठ्ठल दर्शनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातून विठ्ठल भक्त सायकलवर प्रवास करून वारीला निघाले आहेत. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, इंधन बचतीचा संदेश देत, आम्ही पंढरपुरात पोहचणार आहोत. बुलढाण्यातून निघाल्यानंतर सायकल वारीचे जागोजागी स्वागत झाले आहे. आमचा चमू वाटेत योग्य ठिकाणी वृक्षारोपण करून, वारी मार्गस्थ होते. गावकऱ्यांशी संवाद साधून, झाडांचे, पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देत आहोत. नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सायकलवर आलेले वारकरी चौथ्या दिवशी पंढरपुरात पोहचल्यावर, सायकल वारीचा रिंगण सोहळा पार पडणार असून, जवळपास वीस हजार वारकऱ्यांचे रिंगण लक्षवेधी राहणार आहे. असा विश्वास सामाजिक कार्यकर्ते विश्वास गाडे यांनी व्यक्त केला आहे.



सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या दैनिकाचे गेवराई तालुका प्रतिनिधी म्हणून शुभम घोडके यांची नुकतीच निवड झाली आहे. त्या निवडीबद्दल गेवराई तालुक्याचे युवा नेते यशराज भैय्या पंडित यांनी त्यांच्या निवासस्थानी शुभम घोडके यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# माजलगावला मिळाले ३७ नवे पोलीस कर्मचारी

## शहर ठाण्यात २७ तर ग्रामीण ठाण्यात १० नवीन पोलीस कर्मचारी, नागरीकांचे संरक्षण करण्यासाठी सदैव तत्पर; पिआय सूर्यतळ व पीआय कोळी यांच्या पाठपुराव्याला यश

माजलगाव । प्रतिनिधी
माजलगाव पोलिसात गेल्या अनेक वर्षापासून मंजूर पदांपेक्षा निम्मे कर्मचारी पदे रिक्त असल्याने येथील उपलब्ध पोलिस कर्मचाऱ्यावर नेहमीच कामाचा अतिरिक्त तापण पाहत असलेला आहे. त्यामुळे पोलिसांचे संख्याबळ वाढवण्यासाठी पीआय व सूर्यतळ व पीआप कोळी यांनी सतत एमपी कावत त्यांच्याकडे पाठपुरावा करून शहर पोलीस ठाण्यात २७ तर ग्रामीण पोलीस ठाण्यात १० नवीन पोलीस कर्मचारी दाखल करून घेण्यात यश मिळवले आहे. चामुळे पोलिसांचे संख्यावळ वाढल्याने त्यांच्यावर पडनारा अतिरिक्त कामाचा ताण कमी होण्यास मदत होनार आहे.



माजलगाव शहरासह ग्रामीण भागाचा विस्तार आणि लोकसंख्या झपाटयाने बादत आहे. बाजारपेठा, सरकारी कार्यालय, शाळा कॉलेज, मोठमोठे हॉस्पिटल याठिकाणी उभारल्या जात आहेत. त्यामुळे मोडी आर्थिक उलाढ्राल या ठिकाणी होत आहे. राजकीय, सामाजिक स्थिती बदलत आहे. त्यामुळे गुन्हांच्या प्रमाणात बाद होत आहे. शहरासह ग्रामीण भागात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मोठी अडचण निर्माण होत आली आहे. तालुक्याची भौगोलिक राजकीय, सामाजिक परिस्थिती लक्षात घेला पुरेशा प्रमाणात पोलिस कर्मचारी असले पाहिजेत. परंतु याठिकाणी अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर काम भागवल्या जात होते, ज्यामुळे अतिरिक्त कामाचा ताण नेहमीच येतील पोलीस कर्मचाऱ्यांवर पडत आलेला आहे.

माजलगाव शहरासह तालुक्यातील ११६ गावातील नागरिकांचा संपर्क पोलिसांची येतो. शहर पोलिस ठाण्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांसह एकूण ९० पदे मंजूर आहेत. परंतु याठिकाणी ४५ अधिकारी कर्मचाऱ्यावर कामकाज पाहिले जात होते. तर ग्रामीण पोलीस ठाण्यात ८० पद मंजूर आहेत. याठिकाणी ३९ कर्मचाऱ्यांवर कामकाजपाहिले जात होते. शहर तालुक्याचा वाढता विस्तार लक्षात घेता ही अगदी कमी संख्या आहे होती. अपुऱ्या कर्मचा–यांमुळे पोलिसांची चांगलीच दमछाक होत होती. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत होता. यातच कामांची अदलाबदल झाल्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना याचा देखील वेगळा मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे कामगिरीवरही परिणाम होत आहे.

हि बाब लक्षात घेता शहर ठाण्यात रुजू झालेले पो. नि. राहुल सूर्यतळ ग्रामीण ठाण्यात रुजू झालेले बालक कोळी यांनी पोलीस अधीक्षक यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. यासाठी सतत पाठपुरावा केला. याचा परिणाम म्हणून शहर ठाण्यात २७ नवीन पोलीस दाखल झाले आहेत तर ग्रामीण पोलीस ठाण्यात १० पोलीस कर्मचारी दाखल झालेत. यामुळे पोलिसांचे संख्याबळ तालुक्यात वाढले असून त्यांच्यावर पडणारा अतिरिक्त तानाचा काम कमी होणार आहे.

### शहर पोलिसात कार्यरत अधिकारी कर्मचारी

पोलिस निरीक्षक १, सहायक पोलिस निरीक्षक १, पोलिस उपनिरीक्षक २, सहाय्यक पोलिस ७. पोलिस हवालदार २१, पोलिस नाईक ४. पोलिस शिपाई २४, महिला पोलीस ११

### ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत अधिकारी कर्मचारी

पोलिस निरीक्षक १, सहायक पोलिस निरीक्षक १. पोलिस उपनिरीक्षक २, सहायक फौजदार ६. पोलिस पो. नि. हेड कॉन्स्टेबल ८. पोलिस नाईक ५. पोलीस शिपाई १४, महिला पोलीस १२

पान १ वरून...

### ब्रम्हगावचा ठाण्यावाघ सय्यद सद्दाम पटेल...

प्रवेशाची नांदी म्हणून येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक विजयाची नांदी ठरेल असे बोलले जाते.
यावेळी नासेरभाई, सय्यद कदीर भाई, सउद पठाण, सय्यद तय्यबभाई, सय्यद मतीन, इमू पटेल, सय्यद सुजात अली, जे.के. बाबूभाई, शेख जाहेद अली, शेख अलीम, सय्यद लतीफ, शेख अनवर, सय्यद खाजाभाई, सय्यद नूरमिया, सय्यद अजहर, सय्यद अमन, सय्यद नोमान, सय्यद नाजेम, सय्यद शकील, सय्यद अजहर, संतोष गायकवाड, गणपत राठोड आदी उपस्थित होते.

### जीर्ण झालेली विद्युत तार एक फूट अंतरावर पडली

प्रशासनाकडे तक्रार केलेली आहे परंतु याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ चाललेला आहे लवकरात लवकर या तारा बदलून नवीन टाकण्यात याव्यात अशी मागणी गावकऱ्यांनी केलेली आहे अन्यथा याविरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# स्वत:साठी आणि समाजासाठी योग – आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५

२१ जून हा दिवस आता फक्त खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा राहिलेला नाही तर मानवी जीवनात शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्याच्या जागृतीचा एक जागतिक उत्सव म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. दरवर्षी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय योग दिन हा आधुनिक युगातील व्यापक आरोग्य चळवळींपैकी एक झाला आहे. २०२५ मध्ये या दिनासाठी निश्चित करण्यात आलेली संकल्पना आहे. स्वत:साठी आणि समाजासाठी योग. या घोषवाक्यामुळे आपल्याला योगविद्येच्या व्याप्तीचा खरा अंदाज येतो.

मानवाच्या एकूण कल्याणाचा विचार केल्यास, योग हे फक्त शरीर तंदुरुस्त ठेवण्याचे साधन नसून ते मानसिक स्वास्थ्य, भावनिक स्थैर्य आणि सामाजिक समरसतेचंही मूळ आहे. 'स्वत:साठी योग' या विचारामध्ये आत्मशुद्धी, मन:शांती, आणि अंतर्मुखता येतात. दुसरीकडे, 'समाजासाठी योग' हा दृष्टिकोन आपल्याला परस्परसंबंध, सहअस्तित्व, आणि सामूहिक स्वास्थ्याकडे नेतो. आजच्या तणावपूर्ण आणि धकाधकीच्या जीवनात ही समन्वयाची भावना अधिक आवश्यक ठरते.

योग ही भारताने जगाला दिलेली एक अनमोल देणगी आहे. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या साधनेने अनंत ऋषी, योगी आणि संतांना जीवनाच्या गूढ अर्थांशी जोडले, समृद्ध केले. आज जगभरात योगविद्येच्या विविध प्रकारांचा अभ्यास करणाऱ्या लोकांची संख्या कोट्यवधींच्या घरात आहे. योगाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील सार्वत्रिकता – कोणत्याही वयाचा, धर्माचा, सामाजिक स्तराचा माणूस योगाभ्यास करू शकतो. त्यात कोणताही भेदभाव नाही. योगाची ही समावेशकता आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या व्यापक यशामागील खरी प्रेरणा ठरते.

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व वर्षानुवर्षे वाढतच चालले आहे. सरकारी संस्था, शिक्षणसंस्था, सामाजिक संघटना तसेच खासगी उद्योग सुद्धा या दिवशी सामूहिक योग सत्रांचे आयोजन करतात. काही ठिकाणी हे उपक्रम आठवडाभर चालतात. अनेक शहरांमध्ये हजारो लोक एकत्र येऊन उद्याने, मैदानं, समुद्रकिनारे तसेच ऐतिहासिक स्थळांवर एकत्र योग करतात. अशा सत्रांमध्ये सामाजिक सलोख्याचाही अनुभव येतो. योग दिनाच्या निमित्ताने लोकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढते. व्यायामाची सवय लागते. शाळा – महाविद्यालयांमध्ये योग शिकवण्याची चळवळ गतिमान होते. काही संस्था तर नियमित योगशिक्षणाचा कार्यक्रम राबवतात. ग्रामीण भागातही या दिवशी आरोग्य शिबिरे घेतली जात आहेत. विशेष म्हणजे या सगळ्याचा व्यावसायिक हेतू नसतो. हा दिवस एका शुद्ध, नि:स्वार्थी आरोग्य प्रेरणेचा अविष्कार असतो.

२०२५ मधील संकल्पना – स्वत:साठी आणि समाजासाठी योग – अत्यंत समर्पक



आहे. एरव्ही अनेकदा आरोग्यविषयक उपक्रम स्वत:पुरतेच मर्यादित राहतात. पण या थीमनुसार योगाचा प्रभाव व्यक्तिगत आरोग्यापलीकडे जातो. आपण जर शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातून सुदृढ असू, तर आपण समाजात अधिक सकारात्मक भूमिका बजावू शकतो. आपण इतरांच्या मदतीला धावून जाऊ शकतो, संयमी संवाद साधू शकतो आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेत समर्पक भूमिका घेऊ शकतो. आज जगभरात अनेक समाज विकोपाला जात आहेत, त्यामागे वाढती असहिष्णुता, संवादाचा अभाव आणि मानसिक अस्थैर्य ही कारणं आहेत. योगाद्वारे व्यक्तीच्या मनोवृत्तीमध्ये जो स्थैर्य आणि समजुतदारपणा येतो, तोच समाजात दीर्घकालीन शांती साधू शकतो. म्हणूनच 'समाजासाठी योग' ही संकल्पना व्यक्तिगत आरोग्याच्याही पलीकडे जाते, महत्त्वाची ठरते.

या दिनानिमित्ताने आपण आपल्या जीवनशैलीबद्दलही आत्मपरीक्षण करतो. झपाट्याने बदलणाऱ्या जीवनाच्या गतीमुळे आपल्या सवयी, आहार, झोप, आणि विचार यांच्यावर दुष्परिणाम होतो. योगाद्वारे या सगळ्यांत शिस्त, संतुलन आणि जागरूकता निर्माण करता येते. काही काळ नियमित योग केल्यानंतर अनेक जण सांगतात की त्यांना केवळ शरीर सुदृढ वाटते असेच नाही तर निर्णयक्षमता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासही वाढल्याचे जाणवते. हे सगळं 'स्वत:साठी योग' या विचारात सामावलेलं आहे.

शालेय शिक्षणातही योगाचा समावेश आवश्यक आहे. लहान वयातच जर मुलांना योग, प्राणायाम आणि ध्यान शिकवले तर ते अधिक शांत, अभ्यासक्षम, आणि सहृदय होतील. बालवयातील मानसिक आरोग्याचे अनेक प्रश्न आज गंभीर होत चालले आहेत. यावरही योग हा एक निसर्गसंपन्न उपाय ठरू शकतो. ज्या समाजात वृद्धांची काळजी घेतली जाते, तिथेही योग महत्वाची भूमिका बजावतो. वृद्धांसाठी साधे योगासन, श्वसन तंत्र आणि शांत ध्यान यांचा उपयोग शारीरिक वेदना, निद्रानाश आणि चिंता कमी करण्यासाठी होतो. अनेक ज्येष्ठ नागरिक केंद्रांमध्ये योग सत्र आयोजित केले जातात. हे कार्यक्रम केवळ आरोग्यासाठी नसतात, तर सामाजिक संवादासाठीही उपयुक्त ठरतात.

मानसिक आरोग्य या विषयावर जगभर चर्चा होते आहे. योग ही मानसिक आरोग्यासाठी अमूल्य साधना आहे. नैराश्य, चिंता आणि अस्थिरतेपासून दूर राहण्यासाठी ध्यान आणि श्वसनावर आधारित तंत्र अत्यंत उपयुक्त आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन मानसिक आरोग्याच्या चर्चेलाही सकारात्मक दिशा देतो. शिवाय, पर्यावरण आणि योग यांच्यात एक अदृश्य परंतु दृढ संबंध आहे. निसर्गाच्या सान्निध्यात योग करणं, किंवा निसर्गस्नेही जीवनशैली स्वीकारणं, हे योगदृष्टीने आदर्श मानलं जातं. योग हे केवळ व्यायाम नसून जीवनाच्या सर्व पैलूंचा समन्वय साधणारे तंत्र आहे.

हे तत्त्व आपण पर्यावरणाच्या बाबतीतही लागू करू शकतो – म्हणजेच योगामुळे केवळ मनुष्यच नाही तर निसर्गही संरक्षित राहू शकतो.



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड

या दिवशी आपण योगाच्या मूळ भारतीय संदर्भांकडेही पाहायला हवे. योग ही संकल्पना आपल्या ग्रंथांमध्ये 'योग: कर्मसु कौशलम्' या रूपात मांडलेली आहे. म्हणजेच कर्मात कौशल्य म्हणजेच योग. आपले दैनंदिन जीवनही जर समतोल आणि सजगतेने जगता आले, तर ते स्वत:च एक योगसाधना होईल. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, आंतरराष्ट्रीय योग दिन हा कोणत्याही धर्माचा उत्सव नाही. तो सर्व धर्मांपलीकडचा, सर्व संस्कृतींसाठी खुला असा उत्सव आहे. हा दिन एकजुटीचा, सहजीवनाचा, आणि आत्मशुद्धीचा उत्सव आहे. त्यामुळे जगभरातील कोट्यवधी लोक हे सगळे मतभेद बाजूला ठेवून एकाच वेळी, एकाच श्वासात एकत्र येतात. हाच त्याचा खरा गाभा आहे – एकात्मतेचा अनुभव.

आज, २०२५ मध्ये, आपण या दिवसाकडे केवळ एक दिवसापुरता कार्यक्रम म्हणून न पाहता, एक जीवनशैली म्हणून स्वीकारायला हवे. स्वत:साठी आणि समाजासाठी योग हे घोषवाक्य म्हणजे एक दीर्घकालीन दृष्टिकोन आहे. जेव्हा प्रत्येक माणूस स्वत:च्या जीवनात योग घडवतो, तेव्हा समाजात शांती आणि समृद्धी आपोआप फुलू लागते. आंतरराष्ट्रीय योग दिन हा शारीरिक आरोग्याचा, मानसिक स्थैर्याचा आणि सामाजिक समरसतेचा एक संगम आहे. २०२५ सालातील संकल्पना आपल्याला या तीनही स्तरांवर चिंतन करण्यास प्रवृत्त करते. हा दिवस नुसता साजरा न करता, त्याने दर्शवलेली दिशा स्वीकारणं – हाच खरा योग आहे. प्रत्येक व्यक्ती जर स्वत:ला सशक्त करून समाजासाठीही सकारात्मक योगदान देईल, तर जग अधिक समंजस, शांत, आणि सुजाण होईल.

# बीड जिल्ह्याची लवकरच आढावा बैठक घेऊन विकासाची कामे मार्गी लावू : मंत्री भरत गोगावले

## मंत्री भरत गोगावले यांचा छत्रपती संभाजी चौकात शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले यांच्याकडून सत्कार संपन्न

बीड । प्रतिनिधी

राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास कॅबिनेट मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे कणखर नेतृत्व नामदार भरत शेठ गोगावले साहेब हे दिनांक ११ जून बुधवार रोजी सायंकाळी सहा वाजता निनगुर नेकनुर तालुका जिल्हा बीड येथे त्यांचे सारथी श्री शंकर शिंदे पाटील यांच्या मातोश्रीची तब्येत ठीक नसल्यामुळे भेटीसाठी पंढरपूरचा शासकीय कार्यक्रम करून आले होते.

या दरम्यान त्यांनी श्रीक्षेत्र बंकट स्वामी संस्थान निनगुर येथे भेट देऊन श्री बंकट स्वामी महाराज यांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेत संस्थांनसाठी भविष्यात भय्यू निधी देण्याचे अभिवचन मठाचे मठाधीपती श्री लक्ष्मण महाराज मेंगडे यांना दिले. तसेच बीड जिल्हा दौऱ्यानिमित्त आज त्यांनी रात्री साधारणता दहा वाजता रुग्णसेवक, उद्योजक तथा युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या धर्मवीर प्रतिष्ठानच्या संपर्क कार्यालयास बीड येथे भेट दिली.



नामदार भरत शेठ गोगावले हे नेकनुर येथे येत आहेत हा मेसेज वरिष्ठ पातळीवर आल्यानंतर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गणेश उगले प्रत्यक्ष भ्रमणध्वनीवरून नामदार भरत शेठ यांच्याशी संपर्क केला असता मी छत्रपती संभाजी नगर कडे पंढरपूरचा कार्यक्रम करून जात आहे मात्र शंकर शिंदे यांच्या आईला भेटण्यासाठी व श्री बंकट स्वामी मठामध्ये दर्शन घेण्यासाठी मी निनगुर नेकनूर या ठिकाणी येत आहे, परंतु मी बीड जिल्हा शिवसेनेचा सत्कार बीड शहराच्या हायवेवर कुठेही स्वीकारेल आणि थांबेल असा शब्द भ्रमणध्वनी वरून देऊन सत्कारासाठी वेळ दिला. गणेश उगले यांना दिलेल्या शब्दाप्रमाणे नामदार भरत शेठ गोगावले हे रात्रीचे साडेअकरा वाजले तरी छत्रपती संभाजी चौक, महालक्ष्मी कॉर्नर, छत्रपती संभाजी नगर रोड बीड येथे थांबले व गणेश उगले यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन दादा मुळूक व जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा सेनेचे मराठवाडा सचिव बाजीराव दादा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो शिवसैनिकाच्या हजेरीत ढोल ताशा व फटाक्यांच्या आतिश बाजी करत मंत्री महोदयांचा छत्रपती संभाजी महाराज चौक, महालक्ष्मी कॉर्नर, बीड छत्रपती संभाजी नगर हायवे या ठिकाणी उगले पाटील कुटुंब यांच्या वतीने व जिल्हा शिवसेनेच्या वतीने हृदय सत्कार केला.

या प्रसंगी अत्यंत आत्मीयतेने नामदार भरत शेठ गोगावले यांनी हा सत्कार स्वीकारला. रात्रीचे बारा वाजले असताना सुद्धा कसली गडबड न करताना मंत्रिमहोदयांनी सर्वांसोबत फोटो काढले.

छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले आणि उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना नामदार गोगावले म्हणाले की, बीड जिल्ह्यामध्ये जे गाव वस्ती तांडा या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नाही आगामी काळामध्ये ते सर्व पांदन रस्ते, वैयक्तिक जलसिंचन विहिरी, सिमेंट रस्ते, मंदिरे ग्रामपंचायत व तीर्थक्षेत्राच्या ठिकाणची पेवर ब्लॉक अधिक कामे गतीने करण्यासाठी लवकरच बीड जिल्हाधिकारी कार्यालयात रोजगार हमी योजनेची बैठक लावून विकासाची कामे मार्गी लावू. जिल्ह्यातील शिवसैनिकाच्या कामासाठी महायुती मधला शिवसेनेचा मंत्रि म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते आदरणीय एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकाला न्याय देऊ. रात्रीचे बारा वाजलेले असताना सुद्धा गणेश उगले यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील शेकडो शिवसैनिक घेऊन माझा जो सत्कार केला. त्या सत्कारातून त्यांचे प्रेम दिसून येते. लोकहिताच्या कामासाठी उगलेंना सरकारच्या माध्यमातून सदैव मदत व सहकार्य करू असा शब्द देत पुढील दौऱ्यामध्ये निवासस्थानी भोजनासाठी येण्याचे मान्य केले.

याप्रसंगी युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण, नामदार भरत गोगावले यांचे स्वीय सहाय्यक विजय शिंदे सर, साहेबांचे सारथी व निकटवर्तीय शंकर शिंदे पाटील शंकर, युवा सेना मा. जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, युवा सेना जिल्हा समन्वयक सुरज चुंगडे, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील कुर्लेकर सर, अखिल भारतीय युवक मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष भागवत मस्के, शिवसेना गेवराई विधानसभा प्रमुख रमेश कानडे, विश्वजीत उगले, स्वप्निल आबुज, अनिरुद्ध मस्के, अनुरथ मस्के, शिवसेनेचे जिरेवाडी येथील संदीप मोहिते, रोहन दळवे, राजाभाऊ आडागळे, करण कानडे, भगवान मस्के, जगदीश डुकरे, लल्लन यादव, पूर्वेश यादव, राजाभाऊ मस्के, भगवान मस्के, शंकर कानडे, सत्यजित खोड आदीसह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.



# लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

घनसावंगी । प्रतिनिधी

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा घनसावंगी येथील कै. दादासाहेब देशमुख जिल्हा परिषद प्रशाला, घनसावंगी येथे लोकशाही पत्रकार संघ च्या वतीने संस्थापक अध्यक्ष श्री भागवत (बीबी) वैद्य, यांच्या अध्यक्षतेखाली श्री रामेश्वर तांगडे, श्री कैलास वाडकर, श्री मुकीद कुरेशी, श्री ईद्रीस बागवान, श्री लहू धाईत सामाजिक कार्यकर्ते श्री नारायण भाऊ मते, यांनी १० ते १२ गुणवंत विध्यार्थी यांचा प्रमाणपत्र आणि गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भागवत यांनी विध्यार्थी यांना अभ्यास कसा करावा. काही प्रश्न नाही सुटले तर युट्युब, गुगल वर सर्च करून माहिती मिळविली पाहिजे. प्रमुख पाहुण्यांचे भाषणे झाली. लोकशाही पत्रकार संघाच्या पदाधिकारी यांना सर्व शाळा दाखविली खूप छान आणि मोठी शाळा असून अनेक टेक्निकल विषय शिकविली जातात. सर्व शिक्षक गुरुजन वर्गाचे अभिनंदन देखील केले.

यावेळी प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री बाळासाहेब साळुंके, महिला प्रदेश अध्यक्ष निलोफर शेख, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, मराठवाडा उपाध्यक्ष जाहीर कुरेशी,श्री दादा भाऊ जगदाळे, श्री देवा चित्राल, प्रभारी मुख्याध्यापक श्री संजय देशपांडे, श्री शेख अब्दुल गणी, श्री प्रमोद डोंगरदिवे, श्री संतोष कातोरे, श्री राजकुमार सुरडकर, पत्रकार मुक्तार शेख आदीची उपस्थिती होती.

# बीडमध्ये शिक्षणाचा बाजार तेजीत!

## दलाली करणाऱ्या शाळा व्यवस्थापन समित्यांना चाप लावावा : ॲड.धांडे

बीड । प्रतिनिधी

आम्ही सांगू त्याच दुकानदाराकडून वह्या, पुस्तके, शूज, सॉक्स गणवेश व इतर शालेय साहित्य खरेदी करायचा अशी पालकांना सक्ती केली जात असल्याचा आरोप करत शिक्षणाच्या पवित्र कार्याआडून दलाली करणाऱ्या शहरातील शाळा व्यवस्थापन समित्यांना चाप लावावा अशी मागणी ॲड. महेश धांडे यांनी केली आहे.




जगदंब प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश धांडे यांनी म्हटले आहे की मराठवाड्यात नुकत्याच शाळा सुरू झाल्या आहेत. एकीकडे नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत होत असल्याचे दाखवतानाच दुसरीकडे मात्र पालकांची कोंडी केली जात आहे. शाळेत नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची धावपळ सुरू असल्याचे दिसत आहे. त्यातच त्यांची शाळांच्या व्यवस्थापन समित्यांकडून अडवणूक केली जात आहे. शहरातील नामांकित शाळांच्या व्यवस्थापन समित्यांची ठराविक दुकानदारांशी मिलीभगत झालेली आहे. या दुकानदारांकडून चांगले २०, ३० आणि तब्बल ४०% इतके कमिशन घेत पालकांनी त्यांच्याकडूनच शालेय साहित्याची खरेदी करावी अशी सक्ती या व्यवस्थापन समित्यांकडून करण्यात येत आहे. खरे तर शिक्षणासारख्या पवित्र कार्याच्या नावाने अशी दलाली करणे खूप दुर्दैवी असून छत्रपती संभाजीनगरसह महाराष्ट्रात जिथे कुठे यापूर्वी असा प्रकार उघडकीस आला तिथे शासनाकडून पत्रक काढून कारवाई करण्यात आलेली आहे. असे असताना बीड शहरासह जिल्हाभरात मात्र या शाळांच्या व्यवस्थापन समित्यांना शिक्षण विभाग किंवा जिल्हा प्रशासनाचा जराही धाक राहिला नसून त्या राजरोसपणे शिक्षणाचा बाजार मांडत आहेत. याची गांभीर्याने दखल घेत शिक्षण अधिकारी यांनी अशी बेकायदेशीरपणे पालकांना सक्ती करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी ॲड. महेश धांडे, इंजि मनीष मोंढेकर, सागर जवकर, जयेश धोंडगे, गणेश काशीद व इतर यांनी केली आहे.

# चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसने वडवणी तालुक्यात शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटवली आहे : प्रा.राहुल गिरी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील नामांकित चौंडेश्वरी कोचिंग क्लासेच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व विद्यार्थी–पालक मेळाव्याला महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान संपन्न झाले. वडवणी शहरातील शिक्षण क्षेत्रात नामांकित असलेल्या चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व भव्य विद्यार्थी पालक मेळाव्याला प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान रविवार दि.१५ जून २०२५ रोजी चौंडेश्वरी मंगल कार्यालय, श्रीराम मंदिर चौक, वडवणी या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा.श्री.भारतजी जगताप तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुलजी गिरी तसेच ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम ए.पी.आय.पो.स्टे.वडवणी, क्लासेसचे संचालक तुकारामजी दिवटे सर व संचालक सुरज टोंपे सर, सौ.फासे मॅडम आदींजन



मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह सन्मानपत्र व बुके देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, श्रीमती वर्षा व्हगाडे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त त्या म्हणाले की, चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसने आज या ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव करून त्यांच्या पाठीवर टाकलेली कौतुकाची थाप त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरेल त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते प्रा.राहुल गिरी यांचे व्याख्यान संपन्न झाले त्यांनी विद्यार्थी पालकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. वडवणी तालुक्यामध्ये शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटवण्याचे काम चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसचे संचालक सुरज टोंपे सर व तुकाराम दिवटे सर करत आहेत एन.एम.एम.एस.शिष्यवृत्ती परीक्षेत त्यांच्या विद्यार्थ्यांनी बीड जिल्ह्यात रेकॉर्ड केला आहे तसेच स्कॉलरशिप परीक्षा बी.टी.एस.परीक्षा, मंथन परीक्षा, सैनिकी स्कूल परीक्षा, इयत्ता–१० वी बोर्ड परीक्षेत चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे असे ते म्हणाले.

त्यानंतर अध्यक्षीय समारोप पर भारतजी जगताप यांनी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्याचं काम चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून टोंपे सर व दिवटे सर करत आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, पालकांचे, मार्गदर्शक सरांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक संचालक श्री.सुरज टोंपे सर यांनी केले तर सूत्रसंचालन अमोल राठोड यांनी केले व उपस्थितांचे आभार संचालक श्री.तुकाराम दिवटे यांनी मानले. या कार्यक्रमाला गुणवंत विद्यार्थी तसेच पालक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रत्ननगरतांडा जळगव्हाण च्या अंगणवाडी सेविकेची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी : रमेश राठोड

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मौजे रत्ननगरतांडा, जळगव्हाण येथील अंगणवाडी माघील ६ महिन्यापासून बंद आहे का तर.अंगणवाडी मध्ये कार्यरत असलेली अंगणवाडी सेविका गायबच आहेत. सदरील अंगणवाडी सेविके विषय माहिती घेतली आसता प्राथमिक माहिती अशी मिळत आहे कि, अंगणवाडी सेविका खाजगी कारणे दाखवून रजेवर आहेत. परंतु या सेविका आपल्या तिसऱ्या अपत्याच्या प्रसूतीसाठी माघील ६ महिन्यापासून अपत्य लावण्याच्या प्रयत्नात आहेत. या बाबतीत प्रशासनास माहिती होऊ नये म्हणून सदरील सेविका प्रशासनाच्या डोळ्यात धूळफेक करून गायब आहेत. असे समजत आहे. सर्व सामान्य नागरिकांमध्ये अंगणवाडी सेविका हरवली आहे.

सदरील प्रकरणाची सखोल चोकशी करून संबंधित अंगणवाडी सेविकेवर महाराष्ट्र नागरिक सेवा कायदा २०२५ अंतर्गत अपात्र घोषित करून योग्य ती कारवाही करावी अशी मागणी रमेश संतराम राठोड यांनी मा.ना.अजित दादा पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा बीड जिल्हा पालकमंत्री जिल्हा, मा. जिल्हाधिकारी बीड विवेक जॉन्सन साहेब, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, मा. महिला व बाल विकास विभाग अधिकारी जिल्हा परिषद बीड, मा. गट विकास अधिकारी साहेब, पंचायत समिती परळी वैजनाथ, मा. एकात्मिक महिला व बालविकास विभाग पंचायत समिती परळी वैजनाथ यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे अपात्र करण्याची मागणी केली आहे.




शिवसेनेचा ५९ व्या वर्धापन सोहळा १९ जून २०२५ रोजी षण्मुखानंद सभागृह, मुंबई किंगसर्कल येथे पार पडला. या सोहळ्यास सभागृहात जाण्यापूर्वी विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे यांच्या सोबत काही क्षण जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी बीड जिल्ह्यातील स्थानिक प्रश्नावर चर्चा करून सविस्तर चर्चेसाठी वेळ घेतला. यावेळी त्यांच्या समवेत संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव, नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशी.

# रविवारी ईश्वरी कुलकर्णी यांचे गायनाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील संगीत साधना मंचच्या वतीने रविवार २२ मे रोजी सकाळी सव्वा दहा वाजता खोलेश्वर महाविद्यालयातील स्व. गोपीनाथ मुंडे सभागृहात शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी श्रीगार (पुणे) येथील प्रख्यात गायिका ईश्वरी कुलकर्णी यांचे स्वतंत्र गायन होणार आहे. तबल्यावर रत्नदीप शिगे तर संवादिनीवर विश्वजीत धाट हे साथसंगत करतील. या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवसेनेचा ५९ वा वर्धापनदिन बीड जिल्हात व तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत, संपर्कनेते सुनील प्रभू, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वाखाली आज शिवसेना पक्षाच्या ५९ व्या वर्धापनदिन दिनाच्या निमित्ताने शिवसेना बीड तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन शिवसैनिकांनी आज सकाळी शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात सर्व शिवसैनिकांनच्या उपस्थित छत्रपती शिवाजी महाराज व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले.

यावेळी जय भवानी, जय शिवाजी, शिवसेना पक्षाचा विजय असो, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिकांनी दिल्या, विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले यात बीड शहरातील जनमेजय विद्यालय येथे १५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. कोल्हारवाडी येथील जि.प. शाळेत सर्व विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करणयात आली, प्रसिद्ध देवस्थान कंकालेशवर मंदिरात शंभो महादेवाची विधिवत पुजा करुन महाआरती केली व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची भरभराटी होऊ दे अशी प्रार्थना करण्यात आली. जि.प. रत्नागिरी शाळा, मांडवखेल शाळा, आहेरवडगाव शाळा, समनापुर शाळा यांच्यासह विविध शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच पाली येथे शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या मार्गदर्शनाखाली कट्टर शिवसैनिक नसीरभाई पठाण यांच्या



वतीने हायवे रोड पासून मुस्लिम वस्तीपरनंत स्वखर्चातून १०० ट्रॅक्टर मुरुम टाकून रस्ता करण्यात आला आहे.

विविध कार्यक्रमात बोलताना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी सांगितले की, मराठी माणसाच्या स्वाभिमानासाठी व कट्टर हिंदुत्ववाद जोपासण्यासाठी बाळासाहेबांनी शिवसेनेची १९६६ ला स्थापना केली व संपूर्ण महाराष्ट्रात ती रुजवली व मोठी केली त्यामुळेच आजही मराठी माणूस ताट मानाने मुंबई, ठाणे, पुणे व मोठमोठ्या शहरांमध्ये स्वाभिमानाने जगत आहे. शिवसेनेमुळे चहावाले, कुठलंही पद घेतल नाही हेच तर त्यांच आगळवेगळ वैशिष्ट्ये होत पुढे त्यांचा वारसा उद्धव साहेब ठाकरे मोठ्या हिमतीने व ताकदीने पुढे चालवत आहेत दुर्दैवाने ज्यांना मोठं केलं तेच उलटुन पडले आहेत पण अनियतीने कुठलंही काम जास्त काळ टिकत नसते, पुन्हा एकदा उद्धव साहेब यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शिवशाही येईल व राज्य सुजलाम सुफलाम होईल व गद्दारी करणाराच सर्वनाश होईल यात कुठलीही शंका नाही.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आजही निष्ठावंत शिवसैनिक जाग्यावच ठाम आहे, मातोश्रीशी इमान राखून आहे, गेलेले आहेत ते नेते आहेत व जात आहेत तेही माजी आमदार लोकप्रतिनिधी व लाभ घेतलेले लोक आहेत सर्वसामान्य शिवसैनिक इंचभरही हरलेला नाही म्हणून पुन्हा एकदा भरारी घ्यायची आहे व जिंकेपर्यंत लढायचे आहे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्व मजबुत करण्यासाठी जीवाची बाजी लावून काम करायचे आहे व सर्व शिवसैनिक व पदाधिकारी यांनी ते इमानेइतबारे करावे असे आवाहन केले.

या सर्व कार्यक्रमांना तालुका सचिव नंदकुमार येवले, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, उपतालुकाप्रमुख अशोक सगळे, युवासेना तालुका युवा अधिकारी बारिकराध येवले, माजी सरपंच बाळासाहेब वरेकर, सुनिल भाऊ इंडळे, युवा नेते ज्ञानेश्वर सिंघन, रामा जाधव, दिपक घोरपडे, बाबु कुंटे, सतिष जाधव, पिल्लू जाधव, विवेक जाधव, विविध शाळेतील सर्वश्री सुपेकर सर, निर्धार सर, चोरमले सर, शिंदे सर, नरवडे सर, कांड़ेकर मॅडम, पवार मॅडम, मोरे मॅडम, ज्ञानेश्वर सिघन सर व विविध ठिकाणी शाखाप्रमुख, सर्कल प्रमुख, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






आज पाली येथील नागनाथ मंदिर येथे पंढरपूर जाणाऱ्या वारकरी भाविक भक्तांसाठी अखंड अन्नछत्र व प्रथमोपचार उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्यासाठी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर तसेच बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, मारुती खेडकर, तसेच पाली ग्रामस्थ श्री.राहुलजी नवले, बाबासाहेब नवले, वैजीनाथ नवले, जालिंदर नवले, अनिल साळुंके, मधुकर नवले यांची उपस्थिती होती. तसेच श्री.रतिलालजी दुगड, अशोकजी तिवारी, किशोरजी बाहेती, राजूजी राठी, गोविंद मुंदडा, गोटू घोलप यांची उपस्थिती होती. या वेळी पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते पहिल्या ३ दिंडीचे प्रमुख ह.भ.प.सुधाकर महाराज मेहुणकर (मुक्ताबाई देवस्थान मेहुण) ह.भ.प.कृष्णा महाराज गिरी (चैतन्य कानिफनाथ महाराज पायी दिंडी सोहळा) ह.भ.प. रमेश महाराज (वै.सद्गुरू मुकुंद महाराज इंगावनकर) यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संतोषजी सोहनी यांनी सर्वांचे आभार मानले.

# गेवराई न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी रु. निधी मंजुर : आ. विजयसिंह पंडित

## आ. पंडित यांच्याकडून उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार व्यक्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई दिवाणी न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर झाला असून या कामास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. गेवराई येथील न्यायालयाच्या अस्तित्वातील इमारतीवर अतिरिक्त एक मजला आणि चार नवीन कोर्ट हॉलच्या बांधकामाचा यामध्ये समावेश आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी निवडणुक जाहिरनाम्यामध्ये या कामाचे आश्वासन दिले होते. गेवराई न्यायालयीन इारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांचे जाहिर आभार व्यक्त केले आहेत.




विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आपल्या जाहिरनाम्यात आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराई येथील न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासह गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन मतदारांना दिले होते. आ. विजयसिंह पंडित यांनी आश्वासन पूर्तीसाठी निवडून आल्यानंतर सातत्याने प्रयत्न केले. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे अखेर गेवराई न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी १० कोटी २ लक्ष रुपयांचा निधी मंजुर झाला असून गुरुवार, दि.१९ जून रोजी विधी व न्याय विभागाने त्याच्या प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. अस्तित्वातील न्यायालयीन इमारतीवर अतिरिक्त एक मजला आणि चार कोर्ट हॉल यासह इलेक्ट्रिफिकेशन, अग्निशमन यंत्रणा, सीसीटीव्ही, एअर कंडीशन, फर्निचर, लिफ्ट आदी कामांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

गेवराई न्यायालय इमारतीच्या विस्तारीत बांधकामासाठी निधी मंजुर केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे जाहिर आभार व्यक्त केले आहे. विविध विकास कामांच्या उद्घाटनासाठी दि.१९ मे रोजी ना. अजितदादा पवार गेवराई शहरात आले असताना गेवराई न्यायालयातील वकिल संघाच्यावतीने त्यांना या बाबतचे निवेदन देण्यात आले होते. या कार्यक्रमात ना. अजितदादा पवार यांनी या कामाच्या मंजुरीचा शब्द गेवराईकरांना दिला होता. दादांचा पक्का वादा महिनाभरात पूर्ण झाल्याचा अनुभव यानिमित्ताने गेवराईकरांना आला आहे. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर गेवराई न्यायालयात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याचा मार्ग सुकर होणार असल्याची माहिती यानिमित्ताने आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. गेवराई न्यायालयाच्या वकिल संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी आ. विजयसिंह पंडित यांचे या कामाबद्दल आभार व्यक्त केले आहेत.



# सिरसाळा पोलिसांची गुटख्यावर कार्यवाही

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळ पोलिसांनी अवैध धंद्यावर कार्यवाही चा बडगा उगारला आहे. प्रत्येक अवैध धंद्यावर कार्यवाही केली जात आहे. गुटखा विक्री/पुरवठा करणारा एक युवक सिरसाळ पोलिसांनी पकडला असून त्याकडून गुटखा जप्त केला आहे. शेख शाहेद शेख बशीर वय १९ वर्षे राहणार आयेशा कॉलनी, मोहा रोड झोपडपट्टी सिरसाळा ता.परळी जि बीड असे गुटखा विक्रेत्याचे नाव आहे.

दिनांक १७ रोजी १७.५० वाजता मोजे कोयाळ शिवारात सुतारवाडी कडे जाणारे रोडवर कानिफनाथ मंदिरासमोर तालुका धारूर जिल्हा बीड येथे दिनांक १७. ६.२०२५ रोजी १७.५० वाजता मोजे कोयाळ शिवारात सुतारवाडी कडे जाणारे रोडवर तालुका धारूर जिल्हा बीड येथे रुपये ३ हजाराचा गुटखा पकडला आहे. ही कार्यवाही सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांच्या मार्गदर्शनात पोलीस कॉन्स्टेबल ोविंद व्यंकटी भताने वय ३५ वर्षे व्यवसाय नोकरी पोलीस नाईक ब.न. १९९८ नेमणूक पोलीस ठाणे सिरसाळा यांनी केली आहे. आरोपीवर पोलीस स्टेशन सिरसाळा गु.र.नं.१६५/२०२५ कलम १२३, २२३, २७४, २७५ भा.न्या. संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोटर सायकल सह३३ हजाराचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

# पूज्य अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची श्रमिक महासंघाची राष्ट्रपतींकडे मागणी

अंबाजोगाई, बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील श्रमिक महासंघाच्या वतीने भारताचे महामहिम राष्ट्रपती यांना निवेदन पाठवून समाजसुधारक, लोककवी, साहित्यिक आणि श्रमिक नेते पूज्य अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष श्री लक्ष्मण मरीबा वाघमारे यांनी हे निवेदन पाठवले असून, अण्णा भाऊ साठे यांच्या लोकहितकारी कार्याचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान व्हावा, या हेतूने हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.



निवेदनात म्हटले आहे की, अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखन, लोककला आणि आंदोलनात्मक कार्याच्या माध्यमातून समाजातील वंचित, श्रमिक व शोषित घटकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. 'फकिरा', 'माझं जीवनगाणं' यांसारख्या त्यांच्या साहित्यकृती आजही समाजिक जाणीवेचे प्रकाशस्तंभ आहेत. ते पुढे म्हणाले की, तमाशा, पोवाडा, भारूड या लोककला प्रकारांद्वारे त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. अण्णा भाऊंचा हा योगदान केवळ साहित्यिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टीनेही अत्यंत मौल्यवान आहे.

निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, जर शासनाने १ ऑगस्ट २०२५ पर्यंत ही मागणी मान्य केली नाही, तर श्रमिक महासंघाच्या वतीने नवी दिल्लीतील जंतर-मंतरवर शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल. हे आंदोलन पूर्णतः अहिंसात्मक व संविधानिक चौकटीत राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या निवेदनाद्वारे अण्णा भाऊ साठे यांचे कार्य राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळावी आणि वंचित घटकांना प्रेरणा मिळावी, यासाठी सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# ३३ के.व्ही च्या नवीन लाईनच्या कामाचा आ.संदीप क्षीरसागरांकडून शुभारंभ

## बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार

बीड । प्रतिनिधी

बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा भार अत्याधिक असल्याने सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यातून ३३ के.व्ही. च्या १२ किलोमीटर अंतराच्या नवीन लाईनचे काम मंजूर झाले असून या कामाचे आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.२०) रोजी उद्घाटन करण्यात आले आहे. या कामाला लगेच प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.

बीड शहर आणि ग्रामीण भागात वीजपुरवठा करण्यासाठी सद्यस्थितीला १३२ के.व्ही. ची लाईन कार्यरत आहे. याच लाईनवरून बीड शहर आणि ग्रामीण भागातील पेंडगाव, नामलगाव आणि ईट पाणीपुरवठा सबस्टेशनला वीजपुरवठा केला जात होता. परंतु हा होत असलेल्या वीजपुरवठ्याचा भार १३२ के.व्ही. केंद्रासाठी अत्याधिक आहे. त्यामुळे अतिभाराने सातत्याने वीजेचा लपंडाव सुरू होता. सततच्या वीजपुरवठा खंडणामुळे नागरिक त्रस्त झाले असल्याने यावर आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नातून मार्ग काढण्यात आला आहे. यातून मार्ग काढण्यासाठी बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा भार २२० के.व्ही. आणि १३२ के.व्ही. लाईनवर विभागला जाणार आहे. ग्रामीण भागातील पेंडगाव, नामलगाव, कुक्कडगाव आणि ईट पाणीपुरवठा सबस्टेशन १३२ के.व्ही. वरून २२० के.व्ही. लाईनवर शिफ्ट केली जाणार आहेत.



दरम्यान या वीजभाराच्या नियोजित विभागणीसाठी पेंडगाव, नामलगाव, कुक्डगाव, ईट पाणीपुरवठा सबस्टेशनस २२० के.व्ही. केंद्राला जोडणीसाठी एक ३३ के.व्ही. लाईन आवश्यक होती. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नातून ३३ के.व्ही. ची नवीन लाईन मंजूर करण्यात आली. या ३३ के.व्ही. लाईनचे आ.संदीप क्षीरसागरांनी यांनी उद्घाटन केले असून या कामास प्रत्यक्ष सुरूवात करण्यात आली. या नवीन ३३ के.व्ही. च्या लाईनचे अंतर हे १२ किलोमीटर असून त्यामध्ये १५० पोल असणार आहेत. दरम्यान या कामाच्या शुभारंभ प्रसंगी माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह महावितरण विभागाचे अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

### शहर आणि ग्रामीणच्या सबस्टेशनसची होणार शिफ्टींग

सध्या बीड शहरातील आणि ग्रामीण भागातील काही सबस्टेशन १३२ के.व्ही. च्या लाइनला जोडलेले आहेत. परंतु हा सदरचा भार १३२ के.व्ही. केंद्राच्या क्षमतेपेक्षा अधिकचा होत असल्याने वीजपुरवठा व्यवस्थित आणि नियमित होत नव्हता. यावर मार्ग म्हणून १३२ के.व्ही. च्या केंद्रावर असणारी नामलगाव, पेंडगाव, कुक्कडगाव आणि ईट येथील पाणीपुरवठा ही सबस्टेशनस १३२ के.व्ही. वरून २२० के.व्ही. केंद्रावर शिफ्ट केली जाणार आहेत. त्यामुळे शहरातील माळीवेस, एमआयडीसी, जालना रोड, पांगरी रोड ही सबस्टेशन १३२ के.व्ही. आणि ग्रामीण भागातील नामलगाव, पेंडगाव, कुक्कडगाव आणि ईट येथील पाणीपुरवठा ही सबस्टेशनस २२० के.व्ही. वर असे स्वतंत्रपणे जोडले जाणार आहेत.

# बीड सोडले तरी बीडकरांशी नाळ तुटू देणार नाही : डॉ. पूनम भालेराव

बीड । प्रतिनिधी



शहराच्या सुकन्या डॉ. पूनम भालेराव यांना कौटुंबिक कारणामुळे बीड येथील दवाखाना बंद करून पुणे येथे स्थायिक व्हावे लागले. यामुळे बीडकर एका चांगल्या त्वचा सौंदर्य तज्ञाच्या सेवेपासून वंचित राहणार की काय अशी शंका उपस्थित होत होती परंतु या शंकेला आता पूर्णविराम देत दस्तूरखुद्द डॉ. पूनम भालेराव यांनी म्हटले आहे की, बीड सोडले तरी बीडकरांशी नाळ तुटू देणार नाही. प्रत्येक महिन्याच्या एक रविवारी रुग्ण तपासणीसाठी हमखास बीडला भेट देऊन रुग्ण तपासणी करणार आहे. यामुळे महिन्यातून एक दिवस का होईना त्वचा सौंदर्य तज्ञ असलेल्या डॉ. पुनम भालेराव यांची सेवा बीडच्या रुग्णांना मिळणार आहे.

डॉ. पूनम भालेराव या येत्या रविवार दिनांक २२ जून रोजी सकाळी ११:०० ते संध्याकाळी ०४:०० पर्यंत रुग्णांचे पिंपल्स (मरूम), वांग, चेहऱ्यावरील सुरकुत्या, डोळ्याखालील काळे डाग, कोरडी त्वचा, नखांचे आजार, गजकर्ण, पांढरे डाग (कोड), सोरियासिस, स्ट्रेच मार्क (व्रण), त्वचेचे सर्व आजार, सनटेन ट्रीटमेंट, स्कीन टायटनिंग, केस गळती, केसातील कोंडा, केसांची वाढ खुंटणे, हायड्रोफेशियल, मायक्रो नीडलिंग, पी.आर.पी. (केसांसाठी व त्वचेसाठी), शरीरावरील अनावश्यक केसांसाठी उपचार, टॅटू-गोंदण, केमिकल पिलिंग, मस-चामखीळ इत्यादींची तपासणी करणार आहे. याकरिता रुग्ण ८०८०९७३५९८/९०७५ ८६२६८६ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदणी करू शकतात. डॉ. पूनम भालेराव या बीड शहरातील शिवाजीनगर परिसरात नवगण कॉलेज समोरील जानकी मेडिकल येथे रुग्णांची तपासणी करणार आहेत.

# पालीच्या तलाव, कपिलधार धबधब्याकडे जाताना स्वत:ची काळजी घ्या : तहसीलदार

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली या ठिकाणी असलेले बिंदूसरा धरण या ठिकाणी पाणी ओसांडत असून सध्या बीड येथील तरुणाई सेल्फी काढण्यासाठी, पोहण्यासाठी जाते. त्या ठिकाणी फेरफटका मारून सेल्फी काढतांना अनेक जण आढळतात. काही तरुण पाण्यामध्ये पडून त्यांना जीव देखील आपला गमवावा लागू शकतो. ही बाब गांभीर्याने घेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी या ठिकाणी जलसंपदा विभाग व पोलीस विभागाने काळजी घेणे बाबत सूचित केले. त्या ठिकाणी कोणत्याही पर्यटक, नागरिकांनी किंवा कोणत्याही तरुणाने किंवा तरुणीने पाण्याच्या जवळ सेल्फी काढू नये किंवा त्या ठिकाणी पाण्यामध्ये उतरू नये यासाठी सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही अशा प्रकारच्या सुचना वेळोवेळी दिल्या आहेत. दिनांक १९ जून, गुरुवार रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके, बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पाली महसूल विभागाच्या मंडळ निरीक्षक शितल चाटे यांनी नागरिकांना या ठिकाणी सेल्फी काढण्यासाठी सक्त मनाई केली. पर्यटक व नागरिकांना आवाहन केले आहे की कोणीही या ठिकाणी येऊन सेल्फी काढू नये किंवा पाण्याच्या मध्ये जाऊन कोणीही पोहू नये.




जलसंपदा विभागाच्या वतीनेही नागरिकांना असे आवाहन वेळोवेळी करण्यात आले आहे. त्यानुसार पाली येथील तळ्यावर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी जाऊन पाहणी केली. त्यांच्या समवेत बीड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर तसेच पाली व मांजरसुंबा महसूल विभागाच्या मंडळ निरीक्षक शितल चाटे यांनी व पोलीस विभागाचे कर्मचारी या सर्वांनी त्या पाहणी केली. त्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला असलेले मका कणीस विकणारे किंवा त्या ठिकाणी असलेले आईस्क्रीमवाले, बर्फ गोळ्याचे गाडे हे छोटे मोठे व्यवसाय करणारे व्यवसायिक विनापरवाना या ठिकाणी येऊन थांबत असल्याने रिकामी गर्दी होते, वाहतुकीस अडथळा निर्माण होतो हे लक्षात घेता यांना सर्वांना तहसीलदार तसेच पोलीस निरीक्षक मारुती खेडकर व बीड ग्रामीण पोलीस स्टेशन मधील या भागाचे बिट अमलदार आतिश मोराळे, जमादार नामदेव सानप, डीएसबी रवींद्र झुनगूरे सह, मंडळ निरीक्षक शितल चाटे यांनी वरील सर्वांनी समजून सांगून त्या ठिकाणावरून आपापल्या हातगाडी घेऊन जाण्याचे तोंडी आदेश दिले. तात्काळ त्या ठिकाणावरून आपापले गाडे घेऊन बीडच्या दिशेने हे हातगाड्यावाले रवाना झाले. भविष्यात या ठिकाणी कोणीही विनापरवाना मका कणसाचे गाडे किंवा आईस्क्रीमचे गाडे येथे घेऊन येऊ नये व या ठिकाणी नागरिक या गाड्यांची गर्दी करणार नाहीत याची दक्षता घ्यावी नसता कायदेशीर कारवाई या आईस्क्रीम वाल्या गाड्या वर व मकाच्या कणीसवाल्या हातगाड्यावर करण्यात येईल असे पोलीस विभागाने कळविले आहे.

यानंतर तहसीलदार व पोलीस निरिक्षक यांनी श्री क्षेत्र कपिलधार येथील धबधब्याच्या ठिकाणी भेट दिली. तेथील संस्थांनाच्या सचिव यांना सदरील ठिकाणी सुरक्षा रक्षक पूर्ण वेळ ठेवण्यात यावेत, धबधब्याच्या पाणी प्रवाहाच्या समोरील ठिकाणी जाळी लावणे, तसेच दरड कोसळणे, दगड पडणे या गोष्टी गृहीत धरून संरक्षणात्मक जाळी अथवा फेसिन्ग करण्याच्या सूचना दिल्या. पर्यटक यांनी सुद्धा पर्यटन करत असताना स्वत:ची, कुटुंबाची काळजी घेणे आवश्यक आहे. स्वानंद घेताना नियमही पाळले तर प्रशासनावर अतिरिक्त ताण येणार नाही.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT